## (३) आरती तुकारामाची

आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरूधामा ।
सच्चिदानंद मूर्ती । पाय दाखवीं आम्हां ।। धृ० ।।

राघवें सागरांत । जैसे पाषाण तारिलें ।
तैसे हे तुकोबाचे । अभंग उदकी रक्षिलें ।। १ ।।

तुकिता तुलनेसी । ब्रह्म तुकासी आलें ।
म्हणोनी रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ।। २ ।।